# प्रकरण पहिले

## अनिलांच्या काव्याचा परिचय

कवि "अनिल" म्हणजेच "आत्माराम रावजी देशपांडे" यांच्या काव्याचा परिचय करून घेताना त्यांचा व्यक्तिगत परिचय करून घेणे गरजेचे आहे.

त्यांचा जन्म मूर्तिजापूरला दि. 11 सप्टेंबर, 1901 साली रात्री 11 वाजून 55 मिनिटांनी झाला. त्यांची आई सौ. यमुनाबाई व वडील रावजी रामचंद्र देशपांडे हे होत. ते बुलढाणा जिल्ह्यातील सिंधखेडचे देशपांडे होते.

त्यांचे बालपणातील शिक्षण वडीलांच्या नोकरीमुळे एकाच ठिकाणी असे झाले नाही कारण त्यांच्या वडीलांची बदली दोन चार गावी झालेली होती. त्यांची मॅट्रीकची परीक्षा 1919 साली अलहाबाद युनिव्हर्सिटीत झाली. ते दुसऱ्या वर्गात पास झाले. त्यांचे सर्व कुटुंब उमरावतीला स्थायिक झाले होते.

मॅट्रीकनंतरचे शिक्षण फर्ग्युसन कॉलेजमध्ये झाले. ते जेव्हा ज्युनियर बी.ए. च्या वर्गात होते तेव्हा त्यांची उमरावतीची कुसुम जयवंत ही विद्यार्थीनी त्यांच्याच कॉलेजमध्ये होती. तिच्याशी दृष्टभेट झाली. दोन्ही कुटुंब एकाच गावात असली तरी त्यांचा एकमेकांचा परिचय नव्हता.

त्या काळात कॉलेजातील मुलामुलींची मैत्री काय, नुसती ओळख करून घेणेसुध्दा महासंकट असावयाचे. आत्माराम यांना आप्पा ए.आर. असे संबोधले जायचे. वसतिगृहात राहणारी वऱ्हाडी मंडळी होती. ए.आर. हे डिबेटिंग सोसायटीत भाग घेत असत. त्यांची स्वप्नाळू कवी वृत्ती होती त्यामुळे ते विद्यार्थ्यांत चांगलेच प्रिय झाले होते. त्याचप्रमाणे कुसुम ही देखील बुध्दीमान विद्यार्थीनी म्हणून माहिती होती. पण त्याहीपेक्षा तिच्या रूपसौंदर्यानेच ती कॉलेजच्या विश्वात सगळयांच्याच नजरेत भरत असे. अनिल आणि कुसुम यांची पहिली भेट झाली ती अशीच डिबेटिंगचा कार्यक्रम ठरविण्याच्या निमित्ताने. पण ती पाचच मिनिटांची भेट दिठी दीठ मिळविणारी होती.

त्याकाळी फर्ग्युसन महाविद्यालयाचे वातावरण बरेचसे संमिश्र होते. विद्यार्थ्यात कानडी, गुजराथी, पारशी, सिंधी, मुसलमान विद्यार्थीही बरेच असत. डिबेटिंग सोसायटीचे कार्यक्रम इंग्रजीतून व्हावयाचे. प्रिव्हिअसमधील एक विद्यार्थीनी कुसुम जयवंत इंग्रजीतून बोलणार असे समजताच हुजूरपागेच्या विद्यार्थीनी, शिक्षिका आणि इतर बराच स्त्री वर्ग या सभेला उपस्थित होता. कॉलेजचे प्रिन्सिपॉल वासुदेव बळवंत पटवर्धन अध्यक्षस्थानी होते. कुसुमच्या भाषणाचे व धीटपणाचे खूपच कौतुक झाले. त्याच्या थोडे दिवस आधीच "दिठी दीठ" मिळालेल्या एका मनाला दूरवर दिसणाऱ्या या तारकेचे वेध लागले.

याच काळात दोन चार कविता लिहिल्या व त्या मित्रमंडळींना माहित झाल्या. त्या कवितात परस्परांच्या प्रेमाची ओळख पटत होती. प्रतिसाद जाणवत होता. अखेर कुणीतरी या निःशब्द भावगर्भ प्रेम भावनेला वाचा फोडलीच पाहिजे म्हणून 2 जुलै, 1922 ला ए.आर. ने कुसुमला श्लेषावगुंठीत शब्दात एक पत्र लिहिले.

पण हे प्रेम कशा प्रकारचे हा प्रश्न त्यावेळी चांगलाच चर्चीला गेला कारण त्या काळात स्त्री–पुरूषांचे तारूण्य सुलभ आकर्षण, प्रेमभावना त्या दाबून टाकू शकत नव्हत्या. पण आदर्शवादाने त्याकाळी फारच निराळया रितीने चालण्याची प्रथा होती. "आमची मैत्री आहे, पण ती विशुध्द आहे." अशा कितीतरी तरूण मुली अट्टाहासाने सांगत व स्वतःच्या मनाशीही ही कल्पना घट्ट धरून ठेवीत त्यामुळे त्या काळच्या महाविद्यालयीन जगात सुशिक्षित स्त्री–पुरूषांत "प्लेटानिक लव्ह" हा शब्द रूढ झाला होता. म्हणजेच "बंधुभगिनीप्रेम" असे म्हणत.

त्याकाळी स्त्री–पुरूषांच्या प्रथम आकर्षणकाळात एकमेकाला "दादा" व "ताई" म्हणून संबोधण्यातून "आमचे प्रेम आहे पण बहिणी–भावाप्रमाणे, तुमच्या पापी नजरेने त्याचा निराळा अर्थ लावू नका." असे तरूण म्हणत. बहिण–भावाचे प्रेम म्हणजे फारच आदर्श असे मुलींच्यात तरी मानले जाई. आताच्या मुली हा माझा "बॉय फ्रेंड" आहे असे निःसंकोचपणे म्हणू शकतात. पण जेव्हा समवयस्क तरूण स्त्री–पुरूषात मोकळे बोलणे चालणेसुध्दा होत नसे तेव्हा असे स्नेहभावाचे संबंध सांगायला मुली स्वप्नातसुध्दा धजल्या नसत्या.

बंधुभगिनी प्रेम वा प्रेमविषयक आदर्शवादाबाबत एक महत्वाची गोष्ट अशी होती की, त्यात दोघांच्या व्यक्तिमत्वाच्या स्वेच्छ विकासाला वाव असे आदर्श भावनेमुळे चारित्र्यमर्यादेचे रक्षण होत असे आणि आत्मसन्मान, गौरव आणि विश्वास टिकून राही.

उच्च आदर्श भावनेने का होईना रंगून अनिल व कुसुम यांच्यातील स्नेहाकर्षण वाढू लागल्यावर निकटवर्तीयात व कॉलेजात यांचे परस्परावर प्रेम आहे असा गवगवा होऊ लागला व विरोधकांचा एक गटच तयार झाला. घरच्या मंडळींनी पत्रव्यवहार, भेटीगाठी, बोलणे, चालणे सर्व बंद झालेच पाहिजे असा हुकूम सोडला. काही लोकांना कुसुम सारख्या बुध्दिमान, देखण्या मुलीचे ए.आर. वर प्रेम जडावे या गोष्टीचेच वैषम्य वाटले. त्यांनी वाटेल त्या कंडया पिकविल्या, घरच्या मंडळींना निनावी पत्रे लिहिली गेली.

त्यामुळे कुसुमला कॉलेज सोडावे लागले. कडक निर्बंधात राहून 1926 मध्ये नागपूर युनिर्व्हसिटीचे बी.ए. व्हावे लागले. या परीक्षेत पहिला क्रमांक आल्यामुळे तिला इंग्लडांत जाण्याची तीन वर्षांची शिष्यवृत्तीही मिळाली. मात्र तिने इंग्लंडला जाण्यापूर्वी अखरेचा लढा पुकारून निकराने सर्व निर्बंध झुगारून दिले व त्या अनिलांच्या भेटीसाठी उमरावतीला आल्या.

आजच्या काळात जातीनिर्बंध तोडून विवाह होणे हे लोकांच्या अंगवळणी पडू लागले आहे, पण त्या काळी कधी न झालेली, न ऐकलेली अशी ती घटना होती. त्यामुळे समाजात वादळ उठे. ब्राम्हणांतील भिन्न शाखांमध्येही तेव्हा विवाह होत नसत मग आंतरजातीय कोठून होणार ? ब्राम्हण व प्रभू असा आंतरजातीय संबंधाचा हा बहुधा पहिलाच प्रणयपूर्वक झालेला प्रेम विवाह असावा. शिवाय जातीविषमते इतकीच या विवाहात आर्थिक विषमताही होती. कुसुम जयवंत यांचे वडील नामांकित, प्रतिष्ठीत, श्रीमंत वकील म्हणून सरकारदरबारी मान होता. त्यामुळेच त्यांना आपल्या बुध्दीमान मुलीला प्रतिष्ठीत सुंदर स्थळ मिळाले असते, ते सोडून हा एक साधा वकील होणारा पोरगा शोधावा हे मनाला डांचत होते म्हणूनच त्यांनी अनेक कृल्प्त्या योजल्या पण अखेर शंकराला वरणाऱ्या पार्वतीप्रमाणे कुसुमने आपल्या आत्मारामलाच माळ घातली.

त्यांचा कॉलेज जीवनातील जो पत्रव्यवहार झाला तो पुढे "कुसुमानिल" या पुस्तकांत एकत्रित करण्यात आला. या पत्रव्यवहारात काव्य, नाट्य, आशा-निराशेची ऊनसावली आहे, विरहाचे करपून टाकणारे ऊन आहे, शेवटी सायंतारा पण उगवला आहे. प्रणयाचे सारे रंग फिकट गहिऱ्या छटांनी फुलून आले आहेत.

त्याकाळी प्रेम हा विलक्षण असा "जाळपोळी" चा विषय होता. प्रेम अंतःकरणे जाळीत होते. त्यात उडी घेणाऱ्यांना होरपळून काढीत होते. अशा या काळात अनिलांनी प्रेमसाधना केली. सामाजिक विरोधापुढे न डगमगता खंबीरपणे आणि शांतपणे आपले ध्येय साध्य करून दाखविले. 1921 ते 1929 पर्यंतची उपासना त्यांच्या कवितेत प्रतिबिंबीत झाली. त्यांनी पहिली कविता "विसरून जा" 27 डिसेंबर, 1920 साली लिहिली. पुढे ते सर्रास लेखन करू लागले. "फुलवात" हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह. यात कुठेही सामाजिक अन्यायाचा, अगतिकतेचा, कटुतेचा स्पर्श नाही. अचल प्रेमनिष्ठेचा तो पहिला वहिला अविष्कार मन वेधून घेतो.

पुढे वादळ निर्माण होत असताना पाहून "नको जाऊ कोमेजून माझ्या प्रितीच्या फुला रे" म्हणत ते तिला धीर देतात त्या प्रसंगी व्यक्त झालेली "प्रितिवरी विश्वासून घडीभर सोसू ऊन" ही निष्ठाच मुळी त्या काळी मोठी अपूर्वाइची होती. या निष्ठेमागे उदात्ततेचे, मांगल्याचे संस्कार बळकटपणे उभे आहेत.

कवि अनिल व कुसुमावती या सफल प्रेमाची स्पंदने व्यक्त करणारी "फुलवात" मधील कविता भावगीतात्मक आहे. यातून पूर्वसूरींचे व समकालीनांचे सूर स्पष्टपणे ऐकू येतात. घरामध्ये रमणाऱ्या संसारी अनिलांचे रेव्हरंड टिळकांशी नाते जोडता येईल.

"काव्य म्हणजे संगीतगर्भ विचार" असे म्हणून आपल्या गीतांचे स्वरलेखन करणाऱ्या अनिलांची तांबे यांच्या कवितेशी सोयरीक जमवता येईल.

"फुलवात" या पहिल्याच प्रेमगीत संग्रहाने अनिलांनी प्रथम श्रेणीच्या कवीत स्थान मिळविले. 1932 च्या या कविता संग्रहावर रवि किरणी रोमँटीक छाया होती. तरीदेखील भावनेतील उत्कटता मात्र अपूर्व आहे. ही एक वेगळी प्रेमकविता आहे. या कविता ऐन पंचविशीतील आहेत.

या कविता स्वानुभवातून लिहिल्या आहेत. त्यामुळे मुख्यतः प्रेमविषयक असणारी कविता व्यक्तीगत स्वरूपाचीच आहे. अत्यंत उत्कट स्वरूपाची उतरलेली आहेत.

"तुझ्यासाठीच हे काव्य स्फूर्त होवो ।
तुझ्या माझ्या मध्येच विरूनी जावो ।"

अशी या गीतांची वैयक्तिक स्वरूपाची भूमिका आहे. निरनिराळया काळातील त्यांच्या प्रेमगीतातील काही निवडक ओळीवरून त्यांच्या प्रेमभावनेच्या विकासाची ओळख होण्यासारखी आहे. 1922 मध्ये,

"सर्व सुने मज तुझ्या वाचूनी
करावयाचे काय वाचूनी
व्यर्थ जगाच्या पुढे नाचूनी"

अशी त्यांच्या प्रेमी नायकाची प्रेयसी सर्वस्व वृत्ति आहे. 1934 मध्ये "घरात रंगता – जग विसरता" अशी अवस्था आहे.

प्रेमातल्या कथावेदना, सुखसंवेदना, आणाभाका सारे काही या काव्यसंग्रहात काव्यरूपात साक्षीला उभे आहे. जुन्या काळातील प्रेमात मनाचे दर्शन फार थोडे होते. जुन्या कवींच्या शृंगारापेक्षा आधुनिक काळातले प्रेम फार निराळे आहे. जुन्या कवीचे शृंगाराचे वर्णन वैषयिक, पार्थिवतेचे व शरीरापुरतेच असे त्यात मनाचा भावनांचा मागमूसही न्से. स्त्रीचे वर्णन म्हणजे नेत्र, कपोल, वक्षस्थल अशा शारिरीक अवयवांचे वर्णन, शारिरीक सुख अगर कायिक विरह हेच शृंगाराचे सर्वस्व.

अनिलांच्या मते आधुनिक काव्यातले प्रेम ही एक हृदयाची तळमळ आहे, मनोमन जाणीव आहे. हे त्यांच्या आत्मानुभूतीचे प्रत्यंतर आहे. प्रीतीच्या पहिल्या स्पर्शाने नवथर रोमांच व्यक्तिगत अनुभूतीतून व्यक्त करणारा प्रेमाचा यौवनसुलभ प्रत्यय देणारा, प्रेममैत्रीच्या एकनिष्ठ उत्कटतेचा सुरेल आविष्कार मराठी कवितेत प्रथमच होत असला तरी त्यातील आदर्शवादी स्वप्नाळूपणा व यौवनसुलभ अपरिपक्वता लपून रहात नाही. तुझ्या माझ्या मध्येच विरून जाण्यासाठी स्फूरलेले काव्य पुढे "प्रेम आणि जीवन" यामध्ये जगातल्या सुखदुःखाशी मिळालेपणाची व्यापक जाणीव प्रगट करून व्यक्तिप्रेमात विश्वप्रेमाच्या गोष्टी करू लागते.

अनिलांच्या काळातील आधुनिक काव्यात रसराज शृंगारालाच प्रमुख स्थान आहे. आधुनिक काव्य म्हणजे प्रेमगीते त्यांना प्रेमाशिवाय दुसरे काही दिसतच नाही असे म्हणतात. पण ते खरं वाटत नाही कारण प्रत्येक कवीची मनःस्थिती एकच असणार नाही. जितक्या व्यक्ती तितक्या प्रकृति. एखादा कवि प्रेमाला अग्रस्थान देतो तर, दुसरा निसर्गाला अग्रस्थान देतो. काहींना कवितेत सामाजिक अन्यायाने हृदय हललेले दिसेल तर काहींच्या काव्यात राष्ट्रभक्ती ओथंबलेली दिसते. ज्याचा आत्मप्रत्यय त्याप्रमाणे त्याचे काव्य.

आधुनिक काव्यात व्यक्तीचे व वैयक्तिक जीवनाचे महत्व व्यक्तीस्वातंत्र्य, समता या कल्पनांच्या परिणामुळेच आले आहेत. कवीच्या व्यक्तीविषयक अनुभूतीला व सुखदुःखाना अग्रस्थान आहे.

काव्याची जुनी व्याख्या "वाक्यं रसात्मकं काव्यं" अशी होती. आज व्यक्तीत्वाच्या दृष्टीने "उत्कट भावनांचा सहजोद्‌गार" व "संसृतीची टीका" ह्या व्याख्यांची जोड करून दिली. आत्मप्रत्यय हा आधुनिक कवितेचा पाया होऊन बसला आहे. त्यामुळे अनिलांच्या कवितेत भावनांचा सहजोद्‌गार दिसून येतो. व्यक्तीच्या तात्क्षणिक विकारांचा व उत्कट भावनेचा सहजोद्‌गार म्हणजेच भावगीत होय. आत्मप्रत्यय हेच भावगीताचे सर्वस्व आहे. बाह्य अगर आंतर्विश्वातील कोणत्याही गोष्टीचा संबंध येऊन त्याचा परिणाम कविमनावर झाला म्हणजे त्याची भावना उचंबळून येते. उत्कट व अनावर होऊन शब्दरूपाने ती बाहेर पडते.

अनिलांनी प्रेमिकांना एकमेकांविषयी वाटणाऱ्या आपुलकीचे चित्रण "प्रेमाचे ममत्व" या कवितेत केले आहे.

"तिच्या मार्गी तुम्ही कुसुमशत नेवोनि पसरा" परंतु "सखी माझे साधे सुमनचि त्वरे घेईल करी" असा विश्वास त्यातील प्रेमिकाला वाटतो. प्रीति हेच सर्वस्व असणाऱ्या प्रेमिकांना जगातल्या सुखदुःखात निराळेपणाची नव्हे तर मिळालेपणाची प्रतीती येते.

प्रथम परिचयाने निर्माण झालेले प्रेमाचे ममत्व साहसोत्तर प्रेमाचे माधुर्य आणि प्रियेच्या कायमच्या वियोगामुळे मनाची झालेली करूणावस्था अशी महत्वाची विविध रूपे

अनिलांनी लिहिलेल्या प्रेमगीतात दिसून येतात, त्यात वास्तवतेच्या छटा अधिक आढळतात.

प्रियेचा हात नुसता हातात असेल तर कसलीही आणीबाणीची परिस्थिती प्रियकर निभावून नेतो. पण प्रियेचा चिरविरह झाल्यास जो एकाकीपणा येतो त्याची अत्यंत हृदयंगम भावचित्रे अनिलांनी दशपद्यातून चित्रीत केली आंहेत.

1935 मध्ये लिहिलेल्या "प्रेम आणि जीवन" मध्येच त्यांच्या प्रेमाची ही विकास प्रवणता आकारास आलेली आहे कारण त्यात त्यांनी म्हटले आहे,

"प्रेमाचा हेतुः प्रेम करणे, प्रेमी बनणे । व्यक्तीप्रेमात
विश्वप्रेमाची जाणीव घेणे"

प्रेमभावनेकडे पाहण्याचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोनही अनिलांच्या काही कवितातून प्रगट झाला आहे. "प्रेम आणि जीवन" ही कविता महत्वाची आहे. "प्रेम आणि मरण" यांची सांगड आजवरच्या प्रेमगीते लिहिणाऱ्या कवींनी घातली होती परंतु अनिलांनी त्या कल्पनेला विरोध केला आहे कारण अनिल एक मानवतावादी व आशावादी कवी आहेत.

त्यांच्या कविता वास्तववादी आहेत. त्यांनी कल्पनेच्या भराऱ्या मारल्या नाहीत. ते जेव्हा नागपूरला होते त्यावेळी एका प्रेमी युगुलांची घटना घडली. पेरीना भरूचा व चमनलाल धवान ह्या दोघा भिन्नधर्मीय प्रेमिकांनी तेलंगखेडी तलावात आत्महत्या केली. ही वार्ता वाचताच अनिलांना त्यांच्याविषयी जी हळहळ वाटली ती त्यांनी "प्रेम आणि जीवन" या दीर्घकाव्यात व्यक्त केली. अंतरंगदृष्टया ही विलापिकाच म्हणायला हवी. शिर्षकावरून व काव्यांतर्गत काही ओळीवरून अनिलांनी गोविंदाग्रजाच्या "प्रेम आणि मरण" आणि इतर प्रेमकाव्यातील निराशावादाचा अव्हेर केला आहे व प्रेमिकांना धीराचा, संयमाचा, सहनशीलतेचा, निष्ठेचा उपदेश केला आहे. आशावाद शिकविला आहे.

"प्रेम अमृत चिरंतनाचे
मरणाचा नव्हे मार्ग प्रेमाचा"

प्रेमापायी भोगाव्या लागणाऱ्या संकटात आणि दुःखात इतकी जादू असते की, ती इतर सुखांना तुच्छ करील असे अनिलांना वाटते.

प्रेमानेच मानवजातीला पूर्णता येते असा कवीचा विश्वास वरील काव्यात प्रगट झाला आहे. हे काव्य निर्माण झाले तेव्हा कवी रामटेक येथील कोर्टात होते. दिवसा खूप काम असायचे, रात्री कविता मनात घडत असायची ते एका वेगळया रूपात प्रकट करावे असे त्यांना वाटे आणि एका रात्री चमत्कारच घडल्याप्रमाणें स्वप्नात भराभर ओळी सुचू लागल्या. एका मागून एक अशा पंधरा ओळी मुक्तछंदात प्रगटल्या.

पाच आणि सहा अक्षरांचे चरणक असलेला नंतर दोन आणि तीन अक्षरी चरणकांचा "मानवता" मुक्तछंद लिहिला. यानंतरच त्यांना मानवतावादी कवी म्हटलं जाऊ लागलं. प्रणयी जीवांना उद्‌देशून कवीने म्हटले आहे की,

"नाही मी प्रीती शाहीर
प्रीतीचे रडगाणे गाणार ।
शाहीर आहे मी तेजस्वीगाणे
गाणारा प्रीतीच्या आशावादाचा ।"

त्या कालखंडात स्फूट कविता, दीर्घ कविताही लिहिली जात होती. पुरातन काळात स्वतःला प्रेयसी कल्पून परमेश्वराला प्रियतम मानण्याची पध्दत होती. या भक्तीच्या प्रकाराला "माधुर्य भक्ती" हे नाव होते. रविंद्रनाथांवर या विचारसरणीचा प्रभाव होता.

"यावेळी माझ्या ये रमणा", "नववधु प्रिया मी" इ. तांब्यांच्या कविता या विचारसरणीतून निर्माण झाल्या. अनिलांनी या प्रकारच्या कवितांना "प्रतीती धर्मात्मक" हे विशेषण योजिले.

अनिलांचे प्रेमकाव्य आगळे वेगळे आहे. त्यात मिलनापूर्वीच्या आतुरतेचे, मैत्रीचे व नंतरच्या पूर्ततेचे सुरेल संगीत आहे. त्यांचे काव्य उत्तान न होता उत्कट झाले आहे. शिवाय मंदिर, मूर्ति, पूजा, फुले इ. शुभ शब्दांचा समावेश आणि भक्ती, शांती, तृप्ती इ. सौम्य भावनांचा समावेश असल्यामुळे त्यास एक प्रकारचे गूढ सौंदर्य प्राप्त झाले आहे. जुन्या संतांनी वापरलेल्या अक्षर संख्याक छंदाची योजना असल्यामुळे एकंदर काव्यास एक प्रकारचे मांगल्य व माधुर्य प्राप्त झाले आहे.

"प्रतीती धर्मात" प्रतिकाचे महत्व आहे. प्रतीकाशिवाय कोणतीही गोष्ट मनावर ठसत नाही. जसे मानवी प्रेम हे दैवी प्रेमाचे प्रतीक, दिवा हा विश्वव्यापी तेजाचे आणि तेच ज्ञानाचे प्रतीक आहे म्हणून संतांपासून आजच्या आधुनिक कवींनीही प्रतिकांचा उपयोग केला आहे.

आता मराठी डोळयांना व कानांना मुक्तछंदाचा सराव झाला आहे. त्या काळात म्हणजे 25 वर्षापूर्वी मात्र या मुक्तछंदाने साहित्य जगतात हलकल्लोळ मालविला होता. त्यांच्यावर आक्षेप घेण्यात आला होता की, मुक्तछंद म्हणजे गद्यच आणि तो परस्फूर्त म्हणून मराठी परंपरेला विघातक. हा त्यांचा गैरसमज दूर करण्याकरिता मराठी भाषेची मांडणी आणि पंडितपूर्व कवितेची घडण यांच्याशी मुक्तछंदाचे लागे-बांधे आहेत याचा निर्वाळा दिला पण त्यामुळे फारसे समाधान कोणाचे झाले नाही.

"प्रेम आणि जीवन" या काव्याचा विषय काव्यमय तरी होता पण "भग्नमूर्ति" ही नावात जाहिर केल्याप्रमाणेच उघड उघड भंगलेल्या मूर्ती, देवळे यासंबंधी होती. मोडक्या मूर्तीपासून आणि अतिप्राचीन इतिहासापासून काय काय बोध घ्यावयाचा ?

पण आपली संस्कृती कशी आहे, पूर्वीचे कलावंत कसे होते, त्यांनी आपली कला मूर्तीत प्राणपणाने ओतली होती. त्यांचा हा ठेवा आपण जपला पाहिजे असाच बोध व्हावा यासाठी भग्न झालेल्या मूर्तीत कवीने सौंदर्य ओतले होते व त्याची ओळख समाजाला व्हावी हा त्यांचा खटाटोप होता.

भावनेचे क्षेत्र काव्याला आंदण देऊन विचाराचा प्रपंच गद्याच्या हवाली करणारी वाटणी समजूतदार म्हणून सर्वसामान्य होऊ पहात होती. "गद्याची भाषा" कवितेत आली अथवा "वैचारिक" दिसली की ती नकोशी वाटते. पण कवितेतला विचार भावनेशी एकजीव झालेला असतो हे त्याचे निराळेपण पाहिले जात नव्हते.

प्रेमकवी अनिल "फुलवात" भोवतीच घोटाळत राहिले नाहीत. "प्रौढत्वी निजशैषवास जपणे" हा बाणा प्रेमापुरता तरी बाळगणाऱ्या कवीपैकी ते नव्हते. प्रेम-ही प्रौढ, घरंदाज आणि गडद होते. नुसती फेसाळ खळबळ उठविण्याऐवजी खोल आणि

विशाल अंतःप्रवाहासारखे ते अवघ्या संसाराला शीतला देत होते.

"हरींद्रनाथ चटोपाध्यांयानी गमतीने म्हटले आहे की, तरूणपणी माणूस फक्त "प्रेमात पडतो" प्रौढत्वी तो "प्रेम करतो" असल्या "चिर तारूण्या" चे वरदान अनिलांनी स्वतःला दिले नाही. "फुलवात" नंतर अनिलांचे काव्य विश्व कलेकलेने वाढत होते. "फुलवात" नंतर तीन वर्षांनी त्यांनी "प्रेम आणि जीवन" ही मुक्तछंदातील दीर्घ कविता लिहिली व तीनच महिन्यांनी लिहिलेले "भग्नमूर्ती" हे मुक्तछंदातील खंडकाव्य मात्र पाच वर्षानंतर प्रसिध्द झाले.

"फुलवात" च्या कवीने ह्या ही कविता लिहाव्या हे तेव्हा कित्येकांना खरेच वाटेना. "भग्नमूर्ती" या खंडकाव्यात समाजाभिमुखतेच्यादृष्टीने अधिक परिगत अशी अनिलांच्या प्रतिभेची अवस्था प्रकट झालेली आहे. वैयक्तिक सुख दुःखाच्या पातळीवरून विचार करणारे कवीमन आता राष्ट्रसमाजाच्या पातळीवर आले आहे.

1943 मध्ये प्रसिध्द झालेल्या "निर्वासित चिनी मुलास" या खंडकाव्यात एका मुलाचे छायाचित्र पाहिले व त्याचे कावरे बावरे भेदरलेले डोळे असे बोलके होते की त्यांनी कवीला अती बेचैन केले. तो काळच असा होता की, तेव्हा मठ्ठ आणि मुक्त या दोन प्रकारची माणसे सोडल्यास इतरांना दूर पेटलेल्या वणव्याची आतवर झळ लागत होती. युध्दाच्या दैनंदिन चढउतारांवर त्यांचा जीव टांगला होता. प्रत्येकाच्या भावना त्यात गुंतल्या होत्या आणि या भावना पोकळ व केवळ स्वार्थी नसून दीर्घ आणि उत्कट विचाराचे चैतन्यमय रूप होते. हे अमानुषतेने बुजबुजलेले जीर्ण जग कोलमडत आहे व त्याच्या जागी नवे सुंदर जग निर्माण होईल ही निष्ठा त्या कवितेने बोलून दाखविली आहे. तसाच युध्दपिसाटांचा आणि नफेबाजांचा जळजळीत निषेधही "पेर्तेव्हा" या संग्रहात आहे.

दुसऱ्या महायुध्दातून आणि त्या कृष्णाछाया पडलेल्या परिस्थितीतून स्फुरलेल्या सुमारे दहा कविता आहेत. त्याचप्रमाणे काही कविता अशा आहेत की, ज्यांचा विषय कवीभोवतालच्या जगाची सुखदुःखे हा आहे. अशा कवितावर "सामाजिक" "प्रचारात्मक" असा शिक्का मारला गेला आहे.

त्याकाळी नव्या राजकीय विचारांची एक लाट आली. हजारो तरूण त्यात न्हावून निघाले. त्यांना नवे जग हवे होते. ज्या साहित्यातून उत्स्फूर्तता मिळत नाही ते साहित्य कुचकामी असे मानले जात होते. कवी अनिलांनी अत्यंत मुद्देसूदपणे काव्यशक्तीचा प्रत्यय आपल्या शब्दातून श्रोत्यापर्यंत पोहोचवलेला आढळतो. वाङ.मयाच्या वाचनाने भारलेला स्फूर्त झालेला चाचक ती स्फूर्ती, तो विचार, पुस्तके, व्याख्याने, प्रवचने, चर्चा, गोष्टी, संभाषणे या अनेक मार्गांनी पोहोचविणारा स्फुलींग प्रभावबिंदू व शक्तिकेंद्र असतो. हे स्पष्ट करताना मार्क्सच्या "कॅपिटलचे" अत्यंत समर्पक उदाहरण त्यांनी दिले आहे. "कॅपिटल" चे मुळात वाचक किती आहेत व त्यामुळे त्यातील विचाराने विचारक्रांती झालेले लोक त्याच्या किती अधिकपट आहेत यावरून ग्रंथाचे व ग्रंथकर्त्याचे काव्याचे व कवीचे समाजातील महत्व लक्षात येईल.

मात्र विशिष्ट सामाजिक विचारांचा प्रचार क्रांतीचाच प्रसार हे कवितेचे ध्येय बनू शकत नाही हे पण त्यांनी स्पष्ट केलेले आहे. यासाठी आणखी एक त्यांनी रशियन कवीचे उदाहरण दिले. त्याने (सर्जेई येसबिन) क्रांतीत स्वतःला झोकून दिले पण "आपली लाडकी वीणा म्हणजे आपले काव्य मी कुणाला देणार नाही. तुम्ही आशा कराल तसे काव्य लिहिणार नाही, जसे स्फुरेल तसे गाईन" हा त्यांचा स्वतंत्र तडफदार बाणा अनिलांना विशेष उल्लेखनीय वाटलेला जाणवतो. म्हणूनच ते म्हणतात की, "काव्याने प्रचार होईल पण प्रचाराचे काव्य होणार नाही. स्वतःला जे पटेल, अनुभवले, प्रतीत झाले, भावनेतून स्फूर्त झाले त्यातून काव्य आकारास येते. मागणीनुसार पुरवठा हे तत्व काव्यास लागू पडत नाही. क्रांतीची लाट येत आहे तर क्रांतीचे काव्य रचावे हे श्रेयस्कर नाही असे नकली काव्य समाजावर प्रभाव टाकू शकत नाही हे विचार त्यांच्या संयमी शैलीतून त्यांनी व्यक्त केलेले आढळतात. काव्याचे क्रांतीकारकत्व, सामाजिक महत्व जाणले होते "मलाच माझी रूचे खरी कविता मनोहर".

कवीनी हस्तीदंती मनोऱ्यात बसून चालणार नाही, त्यांनी समाजाभिमुख झाले पाहिजे. काव्याच्या टिकाकारांनी काव्याचे महत्वमापन करावे. वाचकांनी काव्याबाबत आस्था बाळगावी कारण काव्य जीवनाचे प्रतिबिंब उमटविणारा आरसाच नाही तर जीवनावर

स्वयंप्रकाश पाडणारी, जीवनास तापविणारी, जीवनाचे बाष्पबिंदू बनविणारी व जीवनास वर्षविणारी सूर्यप्रभा ही आहे." असा त्यांचा विश्वास होता.

अनिलांच्या कवितेत नेहमीच सुरूवातीपासून संस्कृत आणि बोलभाषा यांचे मिश्रण होते. काव्याच्या भाषेबाबत अनिलांनी विविध प्रयोग केले. म्हणून त्यांना प्रयोगशील कवी म्हटले जाते. त्यांनी सतत निरनिराळे प्रयोग करून काव्यात जिवंतपणा ठेवला. मुक्तछंदाने बध्दछंदाची चौकट मोडली त्यामुळे केवळ ओळीच क्वचिक झाल्या नाहीत तर भाषाही नवीन तऱ्हेने वळविण्यास संधी मिळाली.

ज्ञानेश्वरांची पताका अनिलांनी निष्ठेने मिरविली. या "जीवनी आसक्त" असलेल्या माणसालाही "थोडीशी ताटी उघडली असेल." फुटे शब्द निःशब्दाला या धर्तीच्या लौकिक प्रतिमा "फुलवात" नंतर कमी झाल्या तरी त्यामागील विशिष्ट प्रतिकात्मकता अनिलांत भिजून गेली.

त्यांनी दहा ओळींची एक नवी बांधणी करून पाहिली. यातील प्रत्येक ओळ स्वयंपूर्ण असते म्हणजे स्वतंत्र वाक्य पण शेवटी पूर्णविराम नाही. क्वचित स्वल्पविराम आणि उद्गारचिन्ह. 1959 पासून या कविता लिहिल्या. "अश्विन" कवितेचा अपवाद सोडला तर याचा आरंभ "विराणी" ह्या कवितेपासून 7-11-1959 साली झाला.

निरनिराळे प्रयोग करून काव्यात जिवंतपणा ठेवला. ते म्हणतात, "प्रयोग म्हणून मी काव्याच्या क्षेत्रात काहीच केले नाही. हा एक कविता रचनेचा प्रकार आहे. इंग्रजीत याला "फॉर्म" म्हणतात. त्याचे अर्थ अनेक आहेत. या प्रकाराच्या बाह्यांगाचा, अंतरंगाचा आणि गाभ्याचाही शोध घ्यावयास पाहिजे. स्वतःच्या अनुभवाच्या साक्षीचा पुरावाच ग्राह्य मानावा लागणार आहे. ह्या दशपदी कविता म्हणून बऱ्या, वाईट कशाही असोत पण त्या माझ्या भावजीवनातल्या घटना आहेत."

"एकेक आहे तो जिवंत क्षण
ऊन रक्ताने अनुभवलेला"

असा उद्गार "पेर्तेव्हा" संग्रहातील "विशेष" या कवितेत निघालेला आहे.

काव्यनिर्मिती व्यापारात आविष्कार ही अभिव्यक्तीच्या अर्थाची पूर्णावस्था आहे. क्रोचे ह्या सौंदर्यातल्या चिंतकाच्या प्रतिपादनाचा मतितार्थ हा की, "मायकल अँजेलोने कॅन्व्हासवर ब्रशचा पहिला स्पर्श करण्याआधी त्याच्या मनात अस्तित्वात होती ती त्याची खरी कलाकृती, तिचा उत्स्फूर्त अविष्कार ही शुध्द चैतन्यात्मक क्रिया पार्थिव माध्यमातून प्रकट होते ती अभिव्यक्ती."

कविता शब्दांच्या माध्यमातून प्रकट होते ती अभिव्यक्ती आणि अबोध मनातील आशय बाहेर पडण्यापूर्वी मनात जी अचेतन व सचेतन सबाह्य तरंग खळखळ होत राहते आणि तितून शब्द फुटतात तो अविष्कार.

कवी अनिलांची चिरतरूण आणि चिररूचिर कविता अभ्यासाचा विषय झाली, होत आहे आणि होईलही पण भावस्पंदनाची जी अलवार जपणूक त्यांच्या काव्याने केली त्याबद्दल टीकाकारांनाही अलवार शब्द योजावे लागतील. प्रसन्न व्यक्तीत्वाच्या ह्या कवीच्या कवितेत शेवटपर्यंत जी उन्मनी अवस्था आहे ती एका निखळ आशावादी कवीची आहे. निव्वळ गुलजार गीते लिहिण्यार्‍या कवीची नाही. ह्या कवीची प्रतिभा सहजतेने भावतरलतेबरोबरच वैचारिकतेचेही उज्ज्वल दर्शन घडविणारी आहे. ती भावनांच्या उत्कट अविष्काराबरोबरच वैचारिक गंभीर आशयाची धारणा दर्शविण्यासाठी खंडकाव्याचेही रूप धारण करू शकते हे महत्वाचे.

नव्या आकांक्षाचे तेजाळले रूप बघणे, दाखवू पाहणे आणि त्याचे पूजन करणे हा अनिलांचा आशावादाचा आकृतीबंध आहे. अनिलांची कविता नेहमीच सौंदर्याचा शोध घेत आली. "फुलवात" मध्ये शरीर सौंदर्याचे अवडंबर केले नाही तेथे प्रेमाच्या छटा फुलात आणि निसर्गातील अन्य झाडे, फुले, पक्षी यांच्यातून बारीक-सारीक माहिती नादिष्टपणे आत्मसात केलेली आहे. तसेच रंगज्ञानही चित्रकलेच्या हौसेतून निर्माण झाले ते कलकत्त्याला अवनींद्रनाथ टागोर ह्यांचेकडे जानेवारी ते एप्रिल 1924 मध्ये शांतिनिकेतनला नंदलाल बोस ह्यांचेकडे भारतीय चित्रकलेचा अभ्यास करण्यासाठी होते त्यामुळे "मेघांची भूमी" सारख्या कवितेत ढगांचे रंग आणि आकार यांच्या सूक्ष्म तपशिलांची लयलूट केली आहे.

जीवनात या कवीला सगळयाच अनुभवातील भावना, विचार आणि विकार यातील यशापयशातील आनंद व उदासपणातील उत्कटता खोलवर भिडते.

रामटेक येथील त्रिविक्रम वामनाची भंगलेली मूर्ति आणि मंदिर यातून उभी राहणारी संस्कृती ऱ्हासाची कथा, चीनमधील रणकंदनातून निसटलेला अनाथ पोरगा, नफेबाजांचे अनाचार, गरीबांचे भयाण संसार चित्रित केले आहेत. "भग्नमूर्ति" मधील भाषा थोडी गंभीरच होते. संस्कृती ऱ्हासाबद्दल मुक्तछंदात निबंध लिहू लागते.

"जेव्हा राहतात सारेच लोक
ओळखून जीवनैक्य सर्वाचे
तेव्हाच नांदते शक्तिसामर्थ्य
स्वरक्षणाचे, प्रतिकाराचे"

असा निष्कर्ष शेवटी येतो. सांप्रदायिक दृष्टिला एकाचवेळी वास्तववादी व आदर्शलक्षी असलेल्या ह्या काव्यात दिव्य आणि उज्वल संदेश मिळतो.

"भग्नमूर्ति" तील राष्ट्रीय पातळीवरचा कवी "निर्वासित चिनी मुलास" मध्ये आंतर राष्ट्रीय पातळीवर जाऊन पोहोचतो, त्यात भावनांचा प्रक्षोभक जाणवतो. जीर्ण जगाच्या चितेतून नव्या व्यवस्थेचा अमरपक्षी उडणार असल्याची आशा अस्वस्थ करणारी आहे.

काही कवितामध्ये मानवतावादी व आशावादी भूमिका भावपूर्ण अंगाने प्रकट झाली आहे.

"केशवसुता प्रमाणेच अनिलांनीही अनेक कवितातून समाजसुधारकाची व तत्वज्ञानाची भूमिका एकाचवेळी प्रकट केली आहे" असा वा.भा. पाठक यांनी गौरव केला आहे.

"पेर्तेव्हा", "चिरयौवन", "सप्तज्वालामुखी", "मानवता", "बंड" यासारख्या कवितामधून त्यांची ही नवनिर्माणक्षम सामाजिक जाणिवेची ओजस्वी अभिव्यक्ती प्रकट झालेली आहे. "सांगाती" मधील "सारेच दीप कसे मंदावले आता" सारख्या कवितेत समकालीन जीवनातील निराशाही उत्कटतेने प्रकट झालेली दिसते ही कविता कोणत्याही काळाला लागू पडेल अशी आहे.

1936 साली जळगाव साहित्य संमेलनात कवी अनिलांना कोणी तरी म्हणाले की, "या मुक्तछंदात वैविध्य नाही फक्त दोन चरणक" याला अन्यांनी फार चांगले उत्तर दिले ते म्हणाले, "माणसाला दोन पाय असतात पण त्या दोन पायांनी तो विविध चाली चालू शकतो !"

कवी अनिलांनी प्रेमाच्या कविता लिहाव्यात त्वेषाच्या लिहू नयेत असे कोणी म्हणू नये. सामाजिक जाणीवांच्यापेक्षा तरल काव्यात्म पातळी लाभलेल्या त्यांच्या शुध्द भावकविताच शेवटी त्यांच्या काव्यगुणांचा न्याय करतात.

त्यांच्या कवितात सखोल व संमिश्र जाणीवांचा प्रत्यय येतो "अनिल प्रक्षुब्ध विचारांचा "अनल" होण्याचा खटाटोप करतात पण तो व्यर्थ जातो". असे स्पष्टपणे म्हणणाऱ्या कवि रसिकाने अनिलांच्या उत्कट भावशिलतेलाच मान्यता दिलेली आहे. "दशपदी" मध्ये अनिलांच्या भाववृत्तीला एक संमत, प्रगल्भ व समधात असे रूप लाभलेले आहे.

अनिल हे मुळात भावकवी आहेत म्हणूनच त्यांच्या भावनामय प्रतिभेच्या चिमण्या पंखांना विचाराची गरूड भरारी झेपत नाही म्हणून त्यांच्या जीवास झोंबणाऱ्या व मनास चटका लावणाऱ्या माधुर्याची प्रतीती येते.

सरता पावसाळा - निसर्गाची एक प्रसन्न अवस्था यावेळी सृष्टी कशी निवांत दिसते. गात्रे सैल सोडून विसावलेल्या एखाद्या स्त्रीसारखी, तिच्या डोळयांत विविध आठवणी तरळत असतात, भरून अंधारून आलेल्या आभाळाच्या काळया क्रूर मेघांच्या "धुंवारी" च्या आणि "श्रावणझडीच्या" आभाळ निळे - रूप सावळे (शारदागम सांगाती पृ. 61) अनिलांनी हे सृष्टीचे तृप्त रूप जन्माला येतायेताच पाहिले आणि तेच आपल्या कवितेतून जपले.

अनिल आणि बोरकर हे कवि वाटतात ते त्यांच्या देखणेपणामुळे नव्हे, त्यांचे दिसणे कवीचे आहे, बोलणे, चालणे ही कवीचे आहे. आयुष्याच्या प्रत्येक क्षणी "कवि" असणाऱ्या या व्यक्ती आहेत. अनिलांचे व्यक्तिमत्व विलक्षण मृदू आहे. कवीचे व्यक्तिमत्व काव्यात प्रगट होते. त्या व्यक्तीच्या भावना, कल्पना आणि विवेक या बरोबरच विशिष्ट विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन यांचा अंतर्भाव झालेला असतो.

"प्रेम आणि जीवन" या दीर्घ कवितेत प्रेम हे एक चिरंतन, तारणारे मूल्य असल्याचा घोष झाला. "भग्नमूर्तीत" संस्कृतीचा ऱ्हास होत असल्याबद्दल कविमनाला झालेल्या वेदना आहेत.

"सांगाती" त सारेच दीप कसे मंदावल्या" ची खंत आहे. "पेर्तेव्हा" तील काही कविता याबद्दल एक जोरदार प्रतिक्रिया व्यक्त करतात त्यांत "वरती सुंदर फुललेल्या" ना एक उघड आव्हान आहे. जीवनातील दैन्याबद्दल कणव आहे.

अनिलांच्या काव्याचे वैशिष्ट्य असे की ते शेवटपर्यंत विकासशील राहिलेले आहे. "अंतरी भिजलेला" अशा चिरविरहाच्या जाणीवेची थरथर मनीमानसी जपूनही जीवन सौंदर्याचे कण टिपण्याची त्यांची वृत्ती कुठेही कोमजली नाही हा त्यांचा आशावादी वृत्तीचा विजय म्हणावा लागेल.

अनिल हे मुक्तछंदाचे प्रवर्तक आहेत. त्यांनी जो मुक्तछंद कल्पिला त्याची अक्षरसंख्या, मात्रा अगर लघुक्रम यांना बंधन नाही. सुरूवातीस –

जगणे आहेच । धर्म सर्वांचा ।
प्रेम जीवांचे ते । कर्तव्य आहे ।।

याप्रमाणे सहा अक्षरी व पाच अक्षरी चरणकांनी सिध्द होणारा मुक्तछंद ते योजीत असत ते त्याचे नवे नवे प्रयोग करीत. "पेर्तेव्हा" कवितेतील –

"पेरा पेरा पेरा । नवबीजे पेरा ।
नव्या आशा धरा । पेरते व्हा ।

ही त्यांची रचना "सुंदर ते ध्यान" या मोठया अंभगाप्रमाणे आहे. संयमक असल्यामुळे ती नादमधूर झाली आहे.

अनिलांना "विविध रस निर्माण करणे हे कवितेचे प्रयोजन होय". ही व्याख्या अनूरी वाटते. ते म्हणतात –

"विटलो आहो पुरतेपणी
त्याच त्या शृंगार वीर करूणादि नवरसास

रसरसून उसळवील जो मानवतेच्या प्रक्षोभास असा रस
अखंड स्थायीभाव विभाव अनुभाव संचारी भाव
त्याचे अनुभवीत अहो पाखंडी रसायन शास्त्राचा साहित्याचा
अहो घेऊन ध्यास हटविण्यास हल्ले शत्रूचे
मानवमात्राच्या स्थापायास अधिराज समतेचे

ही प्रक्षोभ रसाची कल्पना क्रांतीकारक आहे.

शाब्दिक प्रतिमांच्या आधारे नवकवी आपला आशय प्रकट करतात.

अनिल म्हणतात की, आपण ज्यांना क्षुद्र समजतो त्यांच्यामध्ये एक सुप्त शक्ती असते हा जीवनविषयक मानवतावाद आपल्या कवितातून प्रगट केला आहे.

दीनदुबळ्या विषयी वाटणाऱ्या जिवंत सहानुभूतीतून त्यांची "मानवता" निर्माण झाली आहे.

"वळ पाठीवर आमुच्या चाबुक उडो कोठेही
अवघे अभाग्यांचे अश्रु उभे आमच्या डोळयात

आजच्या जगात अनेकांच्या भावनांचा कोंडमारा झालेला दिसून येतो. पहिल्या पावसाची वाट पाहणाऱ्या परंतु दुःखाने आतल्या आत दुःखाचे कढ सहन करणाऱ्या व्याकूळ पृथ्वीसारखी अनेकांची जीवने आहेत. अशावेळी पृथ्वीला पावसाच्या आगमनाची ग्वाही देणारा पावशा पक्षी "पेर्तेव्हा" ची साद घालतो व मेघगर्जना झाली की म्हणतो –

"भिऊ भिऊ भिऊ नका, भिऊ भिऊ उठा रे सत्वर नव बीजे पेरा
नव्या आशा धरा – पेरते पेरते व्हा"

असा धीराचा संदेश दिला आहे. यात त्यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टि आशादायक झाली आहे. त्यांच्या जीवनविषयक तत्वज्ञानावर सामाजिक परिस्थितीचा घनदाट परिणाम झाला आहे. केशवसुतांप्रमाणेच त्यांनाही अनेक कवितातून समाजसुधारकाची व तत्वज्ञानाची भूमिका प्रगट करावयाची आहे.

"फुलवात" मधील काव्यविश्वापेक्षा त्यांचे काव्य अधिक सामाजिक होत गेले. "भग्नमूर्ति" दीर्घकाव्यामुळे त्यांच्या चिंतनशील वृत्तीची साक्ष अनेकांना पटली. त्यांच्या काव्यकेंद्राबाहेरचे एक तेजस्वी वलय म्हणजे त्यांचे "निर्वासित चिनी मुलास" हे खंडकाव्य या काव्यातील अनिलांची प्रेमभावना विश्वबंधुत्वाच्या कोमल पण चिवट दोरात बध्द झालेली आहे.

या दोन दीर्घ काव्यानंतर अनिल पुन्हा भावगीताच्या प्रांतात उतरलेले दिसतात. मुक्त छंदाचे प्रवर्तन करणारा "पेर्तेव्हा" हा काव्यसंग्रह यानंतर प्रसिध्द झाला.

"फुलवात" मध्ये अनिलांची प्रेमकवितान्वोढा होती तर आता ती "पेर्तेव्हा" मध्ये गृहिणी पदाच्या केंद्रस्थानी विराजमान झालेली दिसते.

"सांगाती" काव्यसंग्रहात अनिलांची अंर्तमुखता अधिक खोल, आर्त अधिक प्रगल्भ झालेली दिसते. तिच्या खानदानीला आता संवेदनांच्या पायघड्यावरून चालण्यात धन्यता वाटते. यौवनात उधळलेल्या काटेरी गुलाबाची बोच आता तीव्रतेने काळजाला जाऊन भिडताना दिसते. "सांगाती" चे एक वैशिष्ट्य म्हणजे निर्यमक मुक्तछंदाचे प्रणेते अनिल पुन्हा सयमक रचनेच्या राजरस्त्यावरून वावरताना दिसतात. म्हणजेच "निराळेपणातून निराळेपणाकडे जाणाऱ्या आपल्या वृत्तीची ओळख त्यांनी आपल्या जीवनाच्या उमेदीच्या काळातच करून दिलेली होती.

अनिलांच्या प्रतिभेचा चाळीस वर्षाहून अधिक काळाचा प्रवास वैयक्तिक सुख दुःखा बरोबर जवळ जवळ अर्धशतकाचे सांस्कृतिक संचित बरोबर घेऊन केलेला हा प्रवास जेवढा दीर्घ तेवढाच इमानाने भरलेला आहे.

"फुलवात" नंतरच्या काळात तांबे, रविकिरण मंडळ यांची चलती सुरू झाली त्यांची कविता वृत्तीतःच वेगळी आहे. विविध कवींच्या वृत्तीविशेषाने एकीकरण त्यांच्या कवितेत सहजपणे आढळते. तीत केशवसुतांचे चिंतनशीलत्व, बालकवीचे सौकुमार्य, तांबे यांचा तृप्तपणा, माधव ज्युलियन यांचे प्रयोगशिलत्व, कुसुमाग्रजांची क्रांतीपूजा, बोरकरांचे रसप्रसन्नत्व आणि मर्ढेकरांची संस्कृतीटीका एकवटली आहे.

अनिलांच्या सुजाण, सुसंस्कृत, रसिक व्यक्तित्वाला कवीपदवी मिळवून दिली ती त्यांच्यातील सौंदर्याच्या सूक्ष्म जाणिवेने व तिच्या सुभग आविष्काराने. गगनी उगवलेला सायंतारा, परसातल्या फुलांचा कानोकानी दाटलेला सुवास, दूर निळया शिवरात होणारे व्योम–धरेचे मीलन, आनंदाचे दहीवर ढाळणारी राग, क्षितीजाच्या काळोखात उरलेली एकच एक प्रकाशरेषा, कोसळलेल्या सरीत भरलेली धुंवारी, मध्यरात्रीच्या निळया आकाशात खुललेले शांत चांदणे, अवसेच्या काळया डोहात तरारणारे पाणी, सागाच्या फुलात चिंब झालेली खिन्न ताटातूट ही आणि यासारखी आर्त, आर्द्र दृश्ये अनेक ठिकाणी विखुरलेली आहेत.

या व्यक्तीत्वाची वीण दुहेरी आहे. घरकुला इतकीच या मनाला सामाजिकतेची ओढ आहे तिचा पल्ला किती मोठा आहे ते "निर्वासित चिनी मुलास" वरून दिसून येतो.

जीवनाच्या आंगोपांगाचे, आशानिराशेचे मुळाशी असलेल्या चैतन्य स्त्रोताचे (लाईफ फोर्स) चिंतन, मनन परीक्षण करणे हाही मनाचा छंद आहे.

प्रेमानुभूतीचा वेगळेपणा, मुक्तछंदाचे प्रवर्तन व प्रयोग, खंडकाव्याचा नवा रूपाविष्कार, सामाजिक जाणिवेचा मानवतावाद व आशावाद यांच्या वैचारिक अविष्काराद्वारे केशवसुती परंपरेचे पुढचे पाऊल थोडा गूढवाद, काव्य भाषेचे नवे प्रयोग उत्कट जीवननिष्ठा आणि विलक्षण भावसमृध्दता इ. अनेक गोष्टी त्यांच्या काव्याची वैशिष्ट्ये होऊ शकतील किंवा सांगता येतील.

या त्यांच्या सर्व काव्याच्या परिचयावरून मनाला वाटते की, त्यांनी आपले नाव आत्माराम रावजी देशपांडे असताना कवी "अनिल" हे नाव कां बरे धारण केले असावे असा प्रश्न पडतो त्यामागील कारण काय असावे.

विजया राजाध्यक्ष यांनी एकदा त्यांनाच विचारले "तुम्ही "अनिल" हे टोपण नांव का घेतले ?" तेव्हा ते म्हणाले, "रेव्हरंड टिळकांच्या कोणत्या तरी कवितेत "जसा अनिल फुलवितो मंद कुसुमाप्रती" अशी एक ओळ आहे. त्यातून हे नाव मनात ठरले. त्याचप्रमाणे बाणभट्टानेही "कुसुमानिल" असा शब्द वापरला आहे. या त्यांच्या "कुसुमानील" शब्दावरून त्यांचा जो वैयक्तिक पत्रसंग्रहाचा अमूल्य ठेवा आहे त्यास

"कुसुमानिल" हे नाव आहे.

कोणत्याही फुलाला वाराच फुलवित असतो त्याप्रमाणेच अनिलांनी आपल्या जीवनाची बाग कुसुमावतीच्या सहाय्याने फुलविली आहे. त्यांच्या या नावातच सुगंध व सार्थकता भरलेली आहे. त्या काळात त्यांनी केलेला आंतरजातीय प्रेमविवाह यशस्वी करून समाजापुढे आशावादी जीवनाचा आदर्श ठेवला आहे. त्यांची निर्भिडवृत्ती त्यांच्या आयुष्यात व काव्यात देखील दिसून येते.

त्यांनी नवा प्रयोग करून मुक्तछंद निर्माण केला व खंडकाव्याची निर्मिती केली. हे खंडकाव्य म्हणजे त्यांचे एक "योगदान" च आहे.

पुढील प्रकरणात "भग्नमूर्ति" आणि "निर्वासित चिनी मुलास" या खंडकाव्याची निर्मिती विचारात घेऊन त्या काव्याचा निर्मिती परिचय करून घ्यावयाचा आहे.

* * * * *

# प्र क र ण   दु स रे

## खंडकाव्याच्या निर्मितीचा परिचय

"खंडकाव्य" म्हणजे दीर्घ कथाकाव्य हा सनातन ललितवाड.मय प्रकार आहे. प्राचीन मराठीतील कथा वाड.मय प्राधान्याने पद्यात आहे. अर्वाचिन काळात मुद्रणसुलभतेमुळे कथा, कादंबरी, नाटक इ. कथानिवेदनाचे गद्य वाड.मय प्रकार उद्‌भवून त्यांचा विकास आणि विस्तार होत असताना खंडकाव्याची पिछेहाट न होता उलट स्वतंत्रपणे विकास झाला आहे. 1850 ते 1950 या शतकात जवळ जवळ तीनशेपर्यंत खंडकाव्ये प्रसिध्द झाली आहे.

पूर्वी पौराणिक काव्ये लिहिली जायची. आज हळूहळू ती काव्ये मागे पडत गेली व ऐतिहासिक, सामाजिक, कल्पनारम्य खंडकाव्ये निर्माण झाली. खंडकाव्य हा निबध्द काव्याचा एक प्रकार मानला जातो. "साहित्य दर्पण" या ग्रंथामध्ये विश्वनाथाने खंडकाव्याची व्याख्या देताना म्हटले आहे "खंडकाव्यं भवेत्काव्यस्यैकदेशानुसारि च ।" संस्कृतातील विदग्ध महाकाव्यांच्या गुणांचे अनुसरण करणाऱ्या पण त्यापेक्षा कमी आवाका असणाऱ्या काव्यांना खंडकाव्य म्हणण्यात येते.

"महाकाव्याच्या विषयापैकी एक विषय घेऊन त्यावर लिहिलेले सलग असे एकाच खंडाचे पण फार मोठे नसलेले काव्य म्हणजे खंडकाव्य अशी कल्पना असावी" असे रा.श्री. जोग यांना वाटते.

खंडकाव्य हा वस्तुनिष्ठ काव्य प्रकार आहे. नाट्यगीतात ही कवी वस्तुनिष्ठच असतो म्हणून "खंडकाव्य हे दुसरे तिसरे काही नसून नाट्यगीताचा सेंद्रिय विकासच होय. कथाकाव्यात अंतर्भूत झालेल्या व्यक्तिमनांचा कविप्रतिभाबलाने छडा लावतो व त्या मनांचा अविष्कार आत्मनिष्ट भावगीताप्रमाणेच उत्कटतेने व्यक्त करतो. "जय मड.गला" या खंडकाव्यात भावगीते नसून "नाटयगीते" आहेत. इतर सलग कथाकाव्यांतही या

नाटयगीताप्रमाणे अनेक स्थळे आढळतात. "खंडकाव्य हा नाटयगीताचा विस्तार आणि विकास आहे" असे मत ह.कि. तोडमल यांनी "अर्वाचिन मराठीतील खंडकाव्ये" या ग्रंथामध्ये मांडले आहे. महाकाव्यापेक्षा खंडकाव्यामध्ये नाटयतत्व अधिक असल्याचे दिसून येते. नाटय ज्या घटनेत असते ती मूलतः कथारूप धारण करण्यास योग्य अशी वस्तू असते. खंडकाव्यात कथावस्तू इतकी आवश्यक असते असे नाही. "मेघदूताची" कथाही क्षीणच आहे. "ऋतुसंहार" ला कोणती कथा आहे ? शिवाय खंडकाव्य हे खरोखरच पूर्णतः वस्तुनिष्ठ असते असे म्हणता येत नाही. आत्मनिष्ठ अनुभव प्रदीर्घ रूपात व्यक्त करण्यासाठी कथा हे एक निमित्त असते. महाकाव्याच्या कथावस्तूचा विकास नाटयशास्त्राच्या नियमाप्रमाणे व्हावा लागतो पण असे बंधन खंडकाव्याला नाही.

कथेला महत्व न देताही कथातत्व आधाराला घेऊन जीवनदर्शन, व्यक्तीदर्शन अथवा विचारदर्शन रंजकतेने घडविण्याच्या वैशिष्टयामुळे कथाकाव्यांतर्गत असलेल्या आख्यान कवितेपासून त्याचे वेगळेपण स्पष्ट होते. खंडकाव्यात कथाकथन एवढे महत्वाचे नसते.

मानवी जीवनाच्या कोणत्याही एका विशिष्ट मर्यादित अंगाचे रसोत्कट दर्शन घडविणारे पद्यरूप कथाकाव्य म्हणजे खंडकाव्य होय.

पद्यरूप नसलेले काव्य असू शकेल पण त्याची गणना खंडकाव्यात करता येत नाही आणि कित्येक खंडकाव्यांची पद्यरचना समाधानकारक झालेली नसेल तरीही त्यांची हकालपट्टी करता येणार नाही. कथा हा खंडकाव्याचा आणखी एक विशेष होय, जी कथाकाव्ये आहेत तीच उत्तम काव्ये आणि कथारहित काव्ये उत्तम नव्हते किंवा काव्यच नाही असे म्हणण्यात काही अर्थ नाही. भावगीताला कथा नसते म्हणून ते कथाकाव्यापेक्षा कमी लेखले जात नाही.

त्याचप्रमाणे संस्कृत साहित्यात महाकाव्याची लक्षणे ठरलेली होती, परंतु खंडकाव्याची लक्षणे निश्चित झालेली नव्हती, त्याचप्रमाणे विपुल प्रमाणात खंडकाव्येही नाहीत म्हणून जी महाकाव्याच्या व्याख्येत बसत नाही तिला "खंडकाव्य" हे संबोधन वापरले. "मेघदूत", "गीतगोविन्दा" ही बारा सर्गाचे पण अल्पविस्तार काव्य यांना खंडकाव्य म्हटले जाते. या काव्यांना कथा आहेत, पण कालीदासाचे "ऋतुसंहार",

जगन्नाथ पंडिताच्या "गंगालहरी" या काव्याना कथा नाही तरीदेखील त्यांची गणना खंडकाव्यात होते.

कथारहित दीर्घकाव्ये प्राधान्याने विचारप्रधान असतात. भावनाविष्कारापेक्षा विचार प्रकटीकरणाला व कल्पना चमत्कृतीला त्यात अधिक महत्व असते. गद्यामधील निसर्गवर्णने, प्रवासवर्णने यांची जर कथा वाड.मयात गणना होत नाही तर पद्यांतील सर्व दीर्घकाव्यांची एकत्र मोट बांधली जाते तेव्हा "गंगावर्णन", "षडऋतुवर्णन" यासारखी निसर्गवर्णनपर दीर्घकाव्ये किंवा "भग्नमूर्ती" सारख्या कथाशून्य चिंतनिका, "राज्यारोहण", "काव्यकिरीट" यासारखी प्रसंगवर्णनपर काव्ये, लेंभे, मोगरे यांच्या विलापिका ही सर्व कथारहित काव्ये असल्यामुळे त्यांची गणना खंडकाव्यात होत नाही असे मत ह.कि.तोडमलांचे आहे.

निसर्गवर्णन आणि चिंतनिका यांचे यश प्रत्येकी अनुक्रमे प्रत्ययकारी चित्रण व मौलिक आत्मनिष्ठ विषयनिष्ठ विचार या दोन सर्वस्वी भिन्न मूल्यावर अवलंबून आहे. दीर्घता हा खंडकाव्याचा एक बाह्य विशेष आहे. काही मेघदूताप्रमाणे अल्पविस्तार असेल, काही विरहतरंग, नारायणराव पेशवे यांचा वध, शशिमोहन, या काव्याप्रमाणे मध्यम लांबीचे किंवा सुधारक, बन्दीशाळा, अभागी कमल या काव्याप्रमाणे प्रदीर्घ असेल पण ते सुनीत भावगीताप्रमाणे स्फुट स्वरूपाचे कधीच असणार नाही.

अशाप्रकारे खंडकाव्याची रचना सुरूवातीला होती आधुनिक काळातील खंडकाव्ये. ही प्राधान्याने सामाजिक विषयावर लिहिलेली आढळतात. पौराणिक, ऐतिहासिक कथानकावरही खंडकाव्य लिहिले जाऊ शकते. पण आधुनिक खंडकाव्याचे लक्ष कथेपेक्षा भावनेकडे व देवदानवापेक्षा किंवा सर्वगुणसंपन्न नायकापेक्षा सामान्य मनुष्याकडे लागलेले दिसते. कथनोत्सुक दीर्घकाव्ये आणि कथारहित दीर्घकाव्ये यात फरक करता येईल, पण या दोहोंचाही समावेश खंडकाव्यात होऊ शकेल.

अर्वाचिन खंडकाव्यात पौराणिक काव्यांची संख्या थोडी आहे. ऐतिहासिक काव्यांची संख्या त्यापेक्षा अनेक पटींनी अधिक आहे आणि कल्पनारम्य सामाजिक खंडकाव्यांची संख्या त्यापेक्षाही अधिक आहे. ऐतिहासिक काव्यापैकी काही काव्ये राष्ट्रीयउद्‌देशाने लिहिली

आहेत. सावरकर व विनायक यांची काव्ये. यांच्या काव्यांचे वातावरण ऐतिहसिक असले कथानक काल्पनिक व कवीनिर्मित अधिक आहे.

"शशिमोहन", "काळाच्या दाढेतून" इ. हाताच्या बोटावर मोजता येणारी, सत्य घटनेवर आधारलेली काव्ये वगळल्यास बाकीची सर्व सामाजिक खंडकाव्ये कविनिर्मित आहेत.

प्राचीन मराठी काव्यावर परपुष्टतेचा आरोप केला जातो कारण ती काव्ये संस्कृतातील साहित्यावर आधारलेली आहेत. पण अर्वाचिन मराठीतील बहुसंख्य खंडकाव्ये कविनिर्मित आहेत. प्राचीन काव्याकडून अर्वाचिन वर्तमानकालीन काव्याकडे येतो तसतसे पात्रे, स्थल, काल यांचे दूरत्व कमी कमी होत जाते आणि सामाजिक काव्यात तर कविवाचकांचे जीवन व काव्य अंतर्गत जीवन यात अद्वैत प्रस्थापित होते.

आज अनेक विषयावर विविध दृष्टिकोनातून खंडकाव्ये रचली जात आहेत. गेल्या चार पाचशे वर्षात युरोपात औद्योगिक क्षेत्रात झपाटयाने प्रगती झाली त्यामुळे मानवाचे भौतिक जीवन बदलले व या बदलत्या मानवी जीवनाचे प्रतिबिंब त्यांच्या वाड.मयात उमटले. 19 व्या शतकात बदललेल्या वाड.मयाची ओळख भारतीयांना शिक्षणाद्वारे होऊ लागली.

अर्वाचिन खंडकाव्याचे दोन कालखंड पडतात हे कारण ऐतिहासिक व सामाजिक खंडकाव्याचा प्राचीन मराठीतील आख्यानकाव्यांचे मोरोपंती वळण सोडण्याचा पहिला प्रयत्न कुंटे यांनी 1869 साली "राजा शिवाजी" हे काव्य लिहून केला. मग हळूहळू खंडकाव्ये इंग्रजी काव्यांच्या वळणावर गेली. 1920 ते 1922 सालापर्यंत ऐतिहासिक काव्येच प्रसिध्द झाली. 1920 पूर्वी तुरळक सामाजिक काव्ये लिहिली गेली. 1904 ते 1905 नंतर निर्माण झालेल्या काव्यात राष्ट्रीय विचार व्यक्त झाले. इतर काव्यात प्रचलित, राजकीय, धार्मिक, सामाजिक घडामोडींचे पडसाद उमटले आहेत.

1920 ते 1940 या वीस वर्षात प्रामुख्याने रविकिरण मंडळातील कवींची सामाजिक खंडकाव्ये व कल्पनारम्य प्रेमकाव्ये गाजली. सहेतुक कलानिर्मिती, पुरोगामी आशय वास्तव कथा सामान्य जनातील व्यक्तिचित्रे, स्वाभाविक भाषा इ. सामाजिक खंडकाव्याचे विशेष आहेत. रविकिरण मंडळांनी प्रचलित सामाजिक विषयांवर इतकी सुंदर काव्ये लिहिली की, "खंडकाव्य" या उपेक्षित, दुर्लक्षित वाड.मय प्रकाराला उजाळा मिळाला. इतर ललित

वाङ.मय प्रकाराबरोबरीचे मानाचे स्थान प्राप्त झाले. सांदीकोपऱ्यात पडलेल्या वाङ.मय प्रकाराला रविकिरण मंडळाने प्रथम आधुनिक रूप दिले व उजेडात आणले.

अनेक कवींना हा वाङ.मय प्रकार अनुकरणीय वाटला. खंडकाव्याला विशिष्ट स्थान प्राप्त करून दिलेले होते. कथाकथन, स्वभावचित्रण, विचार अथवा कल्पना वैभवाचे प्रदर्शन यापेक्षाही भावनोत्कटता तत्कालीन काव्यसंकल्पनेशी सुसंगत अशीच कल्पनारम्य आहे. गिरीशांचे "अभागी कमल", "आंबराई", यशवंताचे "बंदीशाळा", "जय मंगला", माधव ज्युलीयनांचे "सुधारक", "विरहतरंग" ही काव्ये खंडकाव्ये म्हणून प्रतिष्ठित आहेत. अलीकडील उल्लेखनीय खंडकाव्ये म्हणून प्र.श्री. चौधरी यांचे "चंद्रास्त" व कृ.ब. निकुंब यांचे "मृगावर्त" आहेत.

खंडकाव्याच्या रचनेत अनेक प्रकारचे प्रयोग झालेले आहेत. संस्कृतातील महाकाव्यांच्या विदग्ध महाकाव्यांच्या व मेघदूतासारख्या खंडकाव्यांच्या अनुकरणाने काही खंडकाव्ये लिहिली गेली आहेत.

अर्वाचिन काळात खंडकाव्याबरोबरच बरीच अकथात्मक दीर्घकाव्ये प्रसिध्द झाली आहेत. सुरूवातीला संस्कृत आणि इंग्रजी साहित्याच्या परिशीलनातूनच ही काव्ये कवींना स्फुरली आहेत, परंतु 20 व्या शतकात ती स्वयंप्रज्ञेने काव्यनिर्मिती झाली आहे. चिंतनिका उद्‌बोधिका, विलापिका सृष्टीवर्णनात्मक काव्ये, प्रसंगवर्णनात्मक काव्ये इ. अकथात्मक काव्याचे प्रमुख प्रकार कल्पिता येतील. रे. टिळकांनी "वनवासीफूल" हे काव्य परमार्थाने संघर्षपूर्ण आध्यात्मिक आत्मचरित्र लिहिले आहे. ही मराठीतील उत्कृष्ट चिंतनिका आहे.

अनिलांच्या "प्रेम आणि जीवन", "भग्नमूर्ती" व "निर्वासित चिनी मुलास" या ती कथारहित चिंतनिका मुक्तछंदात रचल्या आहेत. परंपरेने चालत आलेल्या खंडकाव्यातील कथा अर्वाचिन काळात कथा, कादंबऱ्या इ. गद्य प्रबंधानी व्यापल्यामुळे खंडकाव्याचे अस्तित्व येथून पुढच्या काळात टिकविण्यासाठी कवींनी आधुनिक जीवनोपयोगी तत्वज्ञान आत्मनिष्ठ भूमिकेवरून सांगणे अवश्य आहे. या चिंतनप्रधान दीर्घकाव्यांसाठी मुक्तछंदाची शिफारस केली व क्रांतिकारक वाङ.मयीन प्रयोग करून दाखविण्याच्या इराद्याने या चिंतनिका लिहिल्या आहेत. ह्या रचनामध्ये भावगर्भ घटनेभोवती जीवनविषयक चिंतन गुंफलेले आढळते.

कविवर्य अनिल म्हणतात, कथनपर दीर्घकाव्यास आता महत्वाचे स्थान उरलेले नाही. लघुकथा व कादंबरी यामधून कथानिवेदन अधिक आकर्षकतेने व स्वाभाविकपणे होत असताना केवळ कथेसाठी खंडकाव्याकडे कोणीही वळणार नाही. कथात्मक खंडकाव्य टिकणार नसल्यामुळे आता खंडकाव्य रचना भावगीताच्या प्रस्ताराच्या स्वरूपाची असली पाहिजे असे ते म्हणतात. भावनात्मक पण जीवनोपयोगी तत्वज्ञान आणि जीवनाची चिकित्सा या भागात संचार केला तरच या वाङ्मय प्रकाराला नवीनता प्राप्त होईल.

अनिल हे रविकिरणमंडळाबरोबर व तदुत्तरकाळी स्वतंत्रपणे वैशिष्टयपूर्ण प्रेमकाव्ये लिहिणारे प्रमुख कवि आहेत. प्रियकर-प्रेयसीच्या, पति-पत्नीच्या सफल प्रेमपूर्वक जीवनातील मधुर - सूक्ष्म - कोमल भावसौंदर्य हळूवार हाताने टिपण्यात त्यांनी अनन्य साधारण यश मिळविले. प्रामुख्याने अंतर्मुख वृत्तीचा हा कवि तीन चिंतनिकात व इतर मुक्तछंदात्मक कवितात आशावादी, मानवतावादी विचार प्रकट करीत आहेत. प्रक्षोभक क्रांतिप्रवण विचार व्यक्तविणाऱ्या त्यांच्या ह्या कविता ओजोगुणात उण्या आहेत.

वा.ना. देशपांडे यांच्या मते 1920 नंतरच्या काळातील काव्यात मुक्तछंदाची निर्मिती ही एक प्रक्षोभक घटना आहे. मुक्तछंदात दीर्घ वैचारिक काव्य लिहिण्याचा पहिला प्रयत्नही अनिलांनीच केला. मुक्तछंद ही नव्या कवितेची नांदी समजली जाते. कवितेवरील वृत्तीदिंची बंधने तोडून टाकून नव्या अनुभूतीला जुळणाऱ्या अभिव्यक्तीचे वाहन मुक्तछंदाच्या रूपाने अनिलांनी रूढ केले. काव्यभाषेचा साचेबंद सांकेतिकपणा मोडला गेला असे म्हणतात की, काव्याच्या प्रत्येकी नवयुगाच्या प्रारंभी एक नवा छंद अवतीर्ण होतो. नवकाव्याच्या युगारंभी मराठी कवितेत मुक्तछंद अवतरला व तिने मराठी कवितेचे स्वरूप पूर्णपणे पालटून टाकले.

मुक्तछंदातील दीर्घकाव्ये लिहून अनिलांनी "फुलवात" पासून एकदम वेगळी वाट शोधली व खंडकाव्याचा एक नवा रूपाविष्कार केला.

कवि अनिल हे रामटेक येथील भग्नमंदिरातील शिल्प पाहण्यास गेले होते. तेथील भग्नशिल्प पाहून त्यांना खूप हळहळ वाटली कारण ती सर्व शिल्प झिजलेली, ऱ्हास झालेली पाहून त्यांना आपल्या संस्कृतीची अनास्था कशी होत आहे हे जाणवले. आपल्या

या भावनेतूनच "भग्नमूर्ति" ह्या काव्याची निर्मिती झाली.

त्यांना चित्रकलेचे, शिल्पकलेचे, स्थापत्यशास्त्राचे ज्ञान होते. तेथील भग्न झालेल्या मूर्ति पाहून ते व्यथित झाले. शिल्प व संस्कृति यांचा विनाश उदास विचारांनी त्यांचे संस्कारक्षम आणि कोमल अंतःकरण व्यापले गेले. कवीच्या प्रतिभेचे वैशिष्टय हे की, ती प्रारंभीच्या भावाकुल अवस्थेमध्ये नुसते अश्रु ढाळीत न बसता विचार रत होऊन ते शिल्पसौंदर्य नष्ट का झाले याची कारणे शोधू लागले आणि त्या शोधापोटी सांगू लागले

आधी पोखरली जाते संस्कृति
तिच्यातील तेज नाहीसे होते
लयाला जाते विचार सामर्थ्य
बनतात विद्या तात्विक केवळ
निरूपयोगी चैतन्यहीन

आणि, हळूहळू मग नाहीसेस होते
सामर्थ्य देखील स्वरक्षणाचे

रक्षण तंत्राची केलेली अवहेलना हिंदू संस्कृतीला कशी नडलेली आहे हे सांगून व्यक्तिवाद, पंथोपपंथ जीवनाविषयी औदासिन्य कणखर वृत्तीची उपेक्षा इ. अनेक कारणांनी आपल्या राष्ट्राला कशी अवकळा प्राप्त झाली याचे कवीनी या काव्यात अत्यंत हृदयद्रावक वर्णन केले आहे.

"भग्नमूर्ति" हे खंडकाव्य 1935 मध्ये लिहून पूर्ण झाले. पहिली आवृत्ती 1940 मध्ये प्रसिध्द झाली. मधल्या पाच वर्षाच्या काळात पुष्कळ काव्यप्रेमी रसिकांना ते वाचून दाखविले. ज्या भग्नमूर्तिविषयसी काव्यात उल्लेख आहेत त्या सर्वच प्रत्येकाने पाहिल्यात असे नव्हते त्यामुळे पुष्कळ रसिकांच्या मनात त्याच्या दृकप्रतिमा उभ्या होत नव्हत्या त्यामुळे मूर्तींच्या प्रतिकृतीही पुस्तक छापताना असाव्या असे अनिलांना वाटले व त्यासाठी पुण्यातील केशव रघुनाथ देशपांडे यांना नागपूरला आणून रामटेकला नेले व मग चित्र काढून मुद्रणप्रत 1939 साली तयार झाली.

त्या काळात "भग्नमूर्ति" विषयी अनेक प्रतिक्रिया उलटसुलट वर्तिल्या गेल्या. "ते

एक अप्रतिम काव्य आहे, ह्या टोकापासून ते काव्यच नाही, प्रवासी लोकांसाठी सचित्र वाटाडे पुस्तक आहे" ह्या दुसऱ्या टोकापर्यंत निरनिराळी मते प्रदर्शित केली. परंतु कवि हा आपल्या अंतरिक जाणिवेशी प्रामाणिक राहूनच काव्यनिर्मिती करीत असतो.

कवि अनिल या काव्याविषयी म्हणतात की, आपल्या संस्कृतीचे वैभव असलेल्या भव्य आणि सौंदर्यपूर्ण कलाकृतीचा क्रूर विनाश पाहून आणि त्याची तीव्र जाणीव होऊन तळमळलेल्या भारतीय हृदयाचा ह्या काव्यात स्वगत उद्गार आहे प्रचार नाही.

या काव्यात कवीने प्रेषिताची भूमिका घेतली आहे आणि "अरे", "पहा", "देखा" असे शब्द वापरून उपदेश आणि प्रचार केला आहे असे समीक्षक म्हणतात. परंतु प्राचीन काय किंवा अर्वाचिन काव्यात असे उद्गार असतातच. इतर भाषातल्या अशा काव्यातही ते आहेतच. हे शब्द त्या उद्गाराचा सहजाविष्कार म्हणून आलेले असतात. त्या उद्गारात "युष्मत" समाविष्ट असतात. त्यात उपदेश नसतो तर "निजबोध" असतो.

"भग्नमूर्ति" तील संस्कृति रक्षणविषयक बोध अधिक उघड क्वचित बटबटीतही वाटला तरी मूलतः तो काव्य विषयात अंतर्भूत आहे. तो विचार वर्षानुवर्षांच्या व्यासंगातून आणि तळमळीतून स्फुरला आहे. मग तो पटो वा न पटो. याचा उच्चार सौम्य आणि रूचिर व्हावा म्हणून त्यावर कसले तरी काव्यमय पुट चढविता आले असते. पण रोखठोकपणातच त्याचे विशिष्ट बळ आहे. ते अशा अडवळणी शब्दातून विखरून गेले असते. एका आर्ष विषयावरील कवितेला आर्ष-वाणीची ही रग अनुरूप आहे.

"भग्नमूर्ति" मध्ये भाषा थोडी गंभीर आहे व संस्कृतीच्या ऱ्हासाबद्दल मुक्तछंदात निबंध लिहू लागते. सांप्रदायिक दृष्टिला एकाचवेळी वास्तववादी व आदर्शलक्षी असलेल्या ह्या काव्यात दिव्य आणि उज्वल संदेश मिळतो.

"भग्नमूर्ति" तील राष्ट्रीय पातळीवरचा कवी "निर्वासित चिनी मुलास" मध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर जावून पोहोचतो.

"निर्वासित चिनी मुलास" या काव्यात त्यांनी चिनी बांधवाची ससेहोलपट करणाऱ्या जपानी साम्राज्यवाद्यांचा निषेध केला आहे. दुसऱ्या महायुध्दात जपान्यांच्या चीनवरील

आक्रमणांत आईबाप, बहिणभाऊ इ. सर्व आप्तस्वकीयांना मुकलेल्या एका चिनी मुलास उद्देशून अनिलांनी हे काव्य लिहिले आहे.

महायुध्दामुळे निर्माण झालेले समाजातील लोकांचे जे चित्र पहावयास मिळाले त्याचे वास्तवचित्रण अनिलांच्या या खंडकाव्यास कारणीभूत झाले आहे. कवी घडत असतो तो आपल्या भावना विचार प्रकट करीत असतो. त्या विचारांना कारूण्यांची किनार लाभली आहे.

त्यांनी एक छायाचित्र पाहिले. त्या छायाचित्रातील बालक, त्याच्या चेहऱ्यावरील हावभाव, त्याची ती भेदरलेली भांबावलेली दृष्टी पाहून कवीच्या मनात उत्कट भावना जागृत झाल्या आणि समाजाची दीन अवस्था काव्यरूपाने प्रकट झाली.

"निर्वासित" मुलगा हे उध्वस्त जीवनाचे एक प्रतीक आहे. ठराविक शैलीवर अवलंबून न राहता भाषेला विषयानुरूप वळण देण्याची दृष्टी दाखविली. ही कविता 1942 च्या राजकीय पार्श्वभूमीवर लिहिली गेली आहे. कवीच्या मानवतावादी विचारांचे प्रसन्न दर्शन घडविणारी ही कविता आहे. त्याच्याविषयी वाटणारा सहानुभाव व जिव्हाळा प्रकट केलेला आहे. राष्ट्रप्रेमात सामावलेली भावना अधिक व्यापक पातळीवर जाऊन विश्वप्रेमाचे विराटरूप दाखवू लागते.

या जीर्ण जगाच्या भूसर आकांक्षाची कृत्रिम उपासमार चालविली जात आहे. स्वार्थी भांडवलदार या विषय समाजरचनेत मानवी प्राण्याच्या मोलापेक्षाही अधिक मोल देऊन किटकजन्य मोती विकत घेतात आणि श्रमजीवी जीवांचे घामाचे बिंदू मातीमोल ठरतात. वास्तवाच्या ध्यासातून, अभिलाषेतून निर्माण होणारी ही भेसूर युध्दे जेत्यांना आणि पराजितांना दोघांनाही नेस्तनाबूत करतात. हे महायुध्दाचे कटू सत्य कवीने सांगितले आहे.

जिथे जिथे मानवतेचे आवाहन होते, त्याचा स्विकार आणि तोही नव्या आकांक्षाच्या आशेने हा त्यांच्या काव्यदृष्टिचा परिपाक होता. म्हणूनच "निर्वासित चिनी मुलास" पाहून आलेले उमाळे हे केवळ सात्विक संतापाचे नाहीत तर मानवताप्रेमी मनाच्या मुक्या हुंदक्यांचे ते सीत्कार आहेत आणि या सीत्कारामुळेच या काव्याची निर्मिती झाली आहे, कारण कवीची वृत्ती भावनाप्रधान आ

विल्फ्रेड ओवेनच्या काही कवितांचा युध्द हा विषय आहे त्याच्याच शब्दात "दि सबजेक्ट ऑफ इट इन वॉर अॅण्ड दि पिटी ऑफ वार दि पोएट्री इज इन दि पिटी" हा प्रवाह "निर्वासित चिनी मुलास" मुळे मराठी कवितेत स्थिरावला.

आसन्नमरण झालेल्या या जीर्ण जगाचा अंत करण्यासाठी कवी उत्सुक आहे पण त्या अधीरतेतही या सरणाने सारेच अवशेष नष्ट होणार आहेत का ? हा प्रश्न कवीला अस्वस्थ करतो पण या अस्वस्थ विचारांबरोबरच त्यांच्या मनातला आशावाद उफाळून येतो.

क्रांतीच्या आशावादाचे गाणे गाणारा हा शाहीर आणि रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल असे आशावादाचे स्वप्न गाणारे कवी "कुसुमाग्रज" यांच्या विचारशलाका परस्परांशी अगदी मिळत्याजुळत्या आहेत.

ते या काव्यातून त्या बालकाला अश्रू पुसण्यास सांगतात. पण केवळ अश्रू पुसून चालणार नाही हे ही कवीला जाणवते कारण आपल्या आसुरी कर्माची फळे या जीर्ण जगाने पहायलाच हवीत नाहीतर या अश्रूबरोबर त्या व्यथा वेदनांची जाणही बुजेल. वात्सल्याचा जणू एक मंगलस्त्रोत स्त्रवताना दिसतो ही वात्सल्यांची भावना विश्वव्यापी आहे.

दुसऱ्या महायुध्दात माणुसकीला लाज आणणारी दृष्ये हृदयाचा ठाव घेतात. नव्या उमेदीची पिढीच्या पिढी बेचिराख झाली होती. पुन्हा शून्यातून सारे उभारावयाचे होते. अशा स्थितीत देशोधडीला लागलेले हे चिनी बालक कवीला अस्वस्थ करते.

दगडमातीच्या कलेत कोरलेली संस्कृती उध्वस्त झाली म्हणून खंतावणारा कवी आणि हे जिवंत आणि जातीवंत उध्वस्त चित्र पाहून जे प्रक्षोभपूर्ण भाव प्रकटीकरण करताना ते निःसंशय अव्वल दर्जाचे आहे.

अन्यायाच्या प्रतिकाराची तीव्र इच्छा आणि सदाचाराचे मांगल्य या पात्रावर कवीचा आशावाद स्थिर झालेला आहे. कवीची भावना ही सहजस्फूर्त असते की, ती मननशील असते याचा विचार केल्यास कवीच्या मनात निर्माण झालेला प्रक्षोभ हा भावनेच्या पहिल्या प्रहरात मनोव्यापारातील दिसून येणारा केवळ खळखळाटच आहे. मनाच्या या अवस्थेत भावना अंधपणाने वावरत असते. जी संवेदना निर्माण होते ती मात्र उत्कट असते. तिची उत्कटता कमी न होता भावनेचा समतोलपणा राखण्यात मनोवृत्ती जेवढी विजयी होईल त्या

मानाने विषयाशी एकरूप होण्याची तन्मयता तर दूर राहण्याची संयमनशीलता असे दुहेरी गुण असतात.

पूर्वी काव्याचा पठण श्रवणाच्या योगे प्रसार होत होता. काव्याचे ग्रहण कानांच्याद्वारे होत होते. आता काव्याचा प्रसार मुद्रणाच्यायोगे होतो. काव्य डोळयांनी वाचून मनाने आकलन केले जाते हा फरक क्रांतिकारक आहे व त्याने यमकाचे काव्यातील स्थान जवळजवळ झाले परंतु या क्रांतिकारक फरकाकडे मराठी काव्यचिकित्सकांचे लक्ष वेधले गेले नाही.

एक काळ असा होता की पद्य हेच वाङ.मय सर्वस्व होते पण हळूहळू गद्याने वाङ.मयाच्या एका एका भागावर आक्रमण करून तो भाग मिळविला. जे गद्यात सांगता येणार नाही ते काव्य असे म्हटले जात होते. त्यादृष्टिने पाहिले तर असा कोणता वाङ.मय प्रकार आहे की, जो गद्यात येवू शकणार नाही ? पण भावगीत हे काव्याचे अंग गद्यात कधीही येऊ शकणार नाही. भावगीतात जे सांगितले, सुचविले जाते ते गद्यात कधीही सांगता येणार नाही. तसे पाहिले तर भावगीत हीच काव्याची मूळ प्रकृति आहे. पण नुसत्या भावगीतातच काव्याचा पूर्ण विकास होऊ शकत नाही. तेव्हा आधुनिक खंडकाव्य वा प्रदीर्घ काव्यरचना ही भावगीताच्या प्रस्ताराच्या स्वरूपाची असली तर साहित्य क्षेत्रात निश्चयाने काव्याचे स्थान राखू शकेल.

स्वतंत्र विषयावर खंडकाव्य लिहिण्याचा प्रकारही अलीकडे सुरू झाला आहे. विषयाचे स्वातंत्र्य हे आधुनिक काव्याचे लक्षण या खंडकाव्यात प्रामुख्याने दिसते. परंतु अंतर्मुख दृष्टीची सापेक्षता हे लक्षण त्यात तितकेसे दिसून येत नाही. खंडकाव्यात कवी हा कथन करणाऱ्यांची भूमिका घेतो व घडलेल्या गोष्टींचे बर्हिमुखदृष्टिने वर्णन करतो.

महत्वाची गोष्ट म्हणजे "खंडकाव्य" ही भारतीय साहित्यशास्त्राची एक विशिष्ट संज्ञा आहे.

साहित्याविषयी अनिलांना नितांत आदर आहे. साहित्य हे एक जीवनाचे पवित्र आणि ऋजु क्षेत्र आहे अशी त्यांची धारणा आहे. आपल्या मतांशी प्रतारणा न करता सर्वांशी गोडीगुलाबीने वागण्याचे कसब त्यांच्या ठिकाणी उपजत आहे.

त्यांचे "भग्नमूर्ति" हे खंडकाव्य आणि इतर अनेक कविता जुन्या विषयींच्या चिडेतूनच निर्माण झाल्या आहेत. वादळ होऊन हे सारे जुने उन्मळून का पडत नाही असे त्वेषाचे उद्‌गार त्यांनी सात वर्षानंतर पुन्हा भग्नमूर्तिचे जुन्याची आणखी सात पुटे चढलेली रूप पाहून काढले.

गेयतेत खुलू लागलेल्या पंखाना त्यांनीच मुक्तछंदात नवी भरारी मारायला लावली.

मानवाचा एक हात आज रचण्यात गुंतला आहे आणि दुसरा तेच मोडण्यात मग्न आहे हे पाहून त्यांचे हृदय विव्हल होते. मानवी जीवनाची मूल्ये अभंग राहिली तर सारी प्रमेये आपोआप सुटतात अशी त्यांची निष्ठा आहे म्हणून मानवी संस्कृतीचे संरक्षण व संवर्धन हेच त्यांना सर्वात मोठे कार्य वाटते. मानवी संस्कृतीवर त्यांची श्रध्दा आहे. भारतीय संस्कृतीवर त्यांची भक्ती आहे. महाराष्ट्र संस्कृतीचा त्यांना अभिमान आहे आणि ह्या तिन्हींमध्ये परस्पर अविरोध आहे असा त्यांचा विश्वास आहे.

शिल्प, चित्र, स्थापत्य इ. कलांच्या भरीव अध्ययनाने त्यांची अभिरूची अत्यंत चोखंदळ व कलात्मक बनली आहे. उत्तम कवितेइतकेच ते उत्तम चित्रानेही मोहून जातात म्हणूनच या दोन खंडकाव्याची निर्मिती झाली आहे.

या दोन खंडकाव्याचा अभ्यास करून पुढील प्रकरणात या खंडकाव्यातील विचार सौंदर्य आणि भावसौंदर्य पहावयाचे आहे.

* * * * *